# टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या हॉटेल मॅनेजमेंट विभागाचा महत्त्वपूर्ण सामंजस्य करार विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण व करिअर संधींना नवी दिशा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या हॉटेल मॅनेजमेंट विभागाने विस्डम करिअर एज्युकेशनसोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MOU) केला आहे. या सहयोगाचा उद्देश विद्यार्थ्यांसाठी परदेशी इंटर्नशिप, अभ्यासक्रम व व्यावसायिक विकास कार्यक्रमाच्या संधी निर्माण करणे हा आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर अनुभव मिळण्यास मदत होईल तसेच त्यांच्या करिअरच्या संधींमध्ये मोठी वाढ होणार आहे. या कराराच्या वेळी विस्डम करिअर एज्युकेशनचे श्री. अंगद सिंग आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ. सुवर्णा साठे (प्रभारी कुलसचिव), डॉ. महेश रंधवे (प्रभारी विभागप्रमुख) आणि डॉ. मानसी साधले उपस्थित होते.

विशेष व्याख्यानाचे आयोजन

या कराराच्या अनुषंगाने हॉटेल मॅनेजमेंट विभागात परदेशी शिक्षण व प्रशिक्षण यासंबंधी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या सत्रासाठी विस्डम करिअर एज्युकेशनचे श्री. अंगद सिंग यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या सहयोगाच्या माध्यमातून विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थी यशस्वीरित्या परदेशात स्थिरावले आहेत आणि उत्तम करिअर घडवत आहेत.

## विद्यार्थ्यांना जागतिक संधी

या करारामुळे हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्य विकसित करता येईल आणि त्यांना आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संधी प्राप्त होतील. त्यामुळे हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होण्यास मदत होणार आहे.

